# शेळ्या व मेंढ्यांमधील प्रथमोपचार

डॉ. पी. एम. घळसासी, श्री. के. एम. चव्हाण, डॉ. चंदा निंबकर

**प्रस्तावना :**

शेळ्या / मेंढ्या आजारी पडल्यानंतर आजार प्राथमिक अवस्थेमध्ये असताना ताबडतोब उपचार केल्यास आजार लवकर आटोक्यात येतो व पुढील नुकसान टळते. आजार व उपचाराचे स्वरूप दिसणाऱ्या रोग लक्षणांवर अवलंबून असते. वेळीच प्रथमोपचार केल्याने शेळी / मेंढी पालकाचे आर्थिक नुकसान व मानसिक त्रास कमी होईल. त्याचप्रमाणे जनावराला होणारा त्राससुध्दा वाचेल.

जनावरांना संतुलित आहार देऊन त्यांची तब्येत नेहमी चांगली राखली तर त्यांची नैसर्गिक प्रतिकारक्षमता सक्षम राहते व जनावरे आजारी पडत नाहीत. मादी शेळ्या / मेंढ्यांवर जेव्हा शारीरिक ताण येतो तेव्हा म्हणजे मुख्यत: व्यायल्यानंतर करडे / कोकरे पाजण्याच्या कालावधीमध्ये त्यांना भरपूर व सकस आहार द्यावा म्हणजे त्यांची रोगप्रतिकारक्षमता कमी होणार नाही. ज्या रोगांवर लसी उपलब्ध आहेत त्या वापरून नियमित शेळ्या / मेंढ्यांचे लसीकरण करून घ्यावे म्हणजे त्या आजारांना बळी पडणार नाहीत.







अखिल भारतीय समन्वित उस्मानाबादी शेळी सुधार प्रकल्प

पशुसंवर्धन विभाग

NARI

निंबकर कृषि संशोधन संस्था (नारी)

फलटण – ४१५ ५२३ जि. सातारा

ईमेल –nimsheep@gmail.com

भाकृअनुप ICAR

| अ) पचन संस्था | प्रथमोपचार पद्धत |
| --- | --- |
| **१) पोटफुगी :** खाद्यातील अचानक बदल, कोवळा व लुसलुशीत हिरवा चारा जादा प्रमाणात खाल्ल्याने तसेच अपचनीय पदार्थ खाण्यात आल्याने होते. | • १ मूठ मॅगसल्फ पावडर + १ मूठ हिमालयन बत्तीसा पावडर एकत्र करणे. त्यातील निम्मा भाग सकाळी व निम्मा भाग संध्याकाळी थंड पाण्यातून ठसका न लागेल या बेताने पाजावे. **किंवा**<br>• अर्धा कप गोडेतेल + अर्धा कप दूध एकत्र करून पाजावे. **किंवा**<br>• टिचभर आले + ४–५ लसूण पाकळ्या + २–३ काळे मिरी दाणे १ ग्लासभर पाण्यात उकळून पाणी गाळून गार करून पाजावे.<br>वरीलपैकी शक्य असेल तो कोणताही एक उपचार करावा.<br>सोबत खाली दिलेले उपचार करावे.<br>• तोंडात लहान काठी जिभेवर ठेवून दोरीने शिंगामागे आडवी बांधून चघळायला लावणे. **किंवा**<br>• लोणचे ३–४ फोडी फडक्यात गुंडाळून जिभेवर ठेवून दोरीने शिंगामागे बांधून चघळावयास देणे. |
| **२) पोटात दुखणे :** ओला निकृष्ट प्रतीचा चारा अतिप्रमाणात खाण्यात आल्यावर पचन न झाल्याने पोटात तसाच राहून पोटात कळा येतात. शेळी / मेंढीच्या पोटात दुखत असल्यास शेळी / मेंढी कण्हते, अस्वस्थ असते. काही वेळा उठबस करते व काही वेळा पोटावर मागील पायाने मारते. खाण्यामध्ये रस दाखवीत नाही. | • १ मूठ मॅगसल्फ पावडर + १ मूठ हिमालयन बत्तीसा पावडर एकत्र करणे. त्यातील निम्मा भाग सकाळी व निम्मा भाग संध्याकाळी पाजणे. (थोडेफार मॅगसल्फ जास्त दिले तरी चालते.) **किंवा**<br>• हिमालयन बत्तीसा / रुचामॅक्स पावडर २–२ चमचे व तेवढ्याच प्रमाणात गूळ घेऊन लाडू करून सकाळी व संध्याकाळी चारावा. **किंवा**<br>• बायोबूस्ट गोळी सकाळी व संध्याकाळी १ याप्रमाणे द्यावी.<br>सोबत खाली दिलेले उपचार करावे.<br>• इंजेक्शन स्पासमोव्हेट प्रौढ शेळीस तीन मिली स्नायूत टोचणे. ह्या इंजेक्शनने पोट दुखावयाचे कमी होते. **किंवा**<br>• व्हिटॅमिनचे इंजेक्शन बेलामिल / बिकॉमेल / लिवामिल यापैकी उपलब्ध होईल त्यामधील १ इंजेक्शन प्रौढ शेळी / मेंढीस तीन मिली स्नायूत टोचणे. यापैकी शक्य असेल तो उपचार करावा. |

| अ) पचन संस्था | प्रथमोपचार पद्धत |
|---|---|
| **३) डरंगळणे :** जास्त प्रमाणात हिरवा, निकृष्ट प्रतीचा बुरशीयुक्त चारा तसेच खाद्य व पाण्यातील जीवाणूंमुळे व इतर विषबाधेमुळे पातळ संडास मोठ्या प्रमाणात होते. | • नेबलॉन पावडर रोज १ चमचा १ कप पाण्यात मिसळून ३ दिवस पाजावी. **किंवा**<br>• लिहिण्याच्या खडूची पावडर + पानात खायचा कात १ तुकडा यांची बारीक पूड करून पाजावी. **किंवा**<br>• फेझॉल किंवा पेसुलीन गोळी सकाळी व संध्याकाळी अर्धी गोळी ३ दिवस द्यावी.<br>• गोळी व पावडरने डरंगळणे थांबत नसेल किंवा कमी होत नसेल तर इंजेक्शन सल्प्रिम / ओरिप्रिम प्रौढ शेळी / मेंढीस पहिल्या दिवशी तीन मिली, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी दीड मिली याप्रमाणे स्नायूत टोचावे.<br>वरीलपैकी शक्य असेल तो कोणताही एक उपचार करावा. सोबत खाली दिलेले उपचार करावे.<br>• घरगुती उपाय म्हणून २ मुठी शिसम झाडाचा पाला वाटून त्याचा रस दिवसातून २ वेळा पाजावा. कळकाचा पाला खाण्यासाठी द्यावा. |

| ब) श्वसन संस्था | प्रथमोपचार पद्धत |
|---|---|
| **१) सर्दी+ताप+ठसकणे :** हवेतील एकदम बदल, पावसाळ्यात जास्त काळ भिजणे, कोंदट व गर्दीची जागा, जास्त काळ गार झोंबणाऱ्या वाऱ्याच्या संपर्कात येणे. | • कॅफलॉन पावडर ३ चमचे + तेवढाच गूळ व कापराची अर्धी वडी घालून लाडू तयार करून तीन दिवस चारणे.<br>• सर्दी, ताप, ठसकणे जास्त असल्यास इंजेक्शन सल्प्रिम/ ओरिप्रिम प्रौढ शेळी / मेंढीला पहिल्या दिवशी तीन मिली दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी दीड मिली स्नायूत टोचावे.<br>• शेळ्या मेंढ्या स्वच्छ, कोरड्या व उबदार ठिकाणी ठेवाव्यात. |
| **२) नाकातून शेंबूड / लालसर शेंबूड वाहणे :** पावसात भिजून थंड वाऱ्याच्या झोतात राहिल्याने, कोंदट दाटीवाटीच्या ठिकाणी सतत राहून, विषाणूजन्य आजारांमध्ये. | • प्रतिजैविक इंजेक्शन टोचणे. **किंवा**<br>• इंजेक्शन सल्प्रिम / ओरिप्रिम प्रौढ शेळी / मेंढीस पहिल्या दिवशी तीन मिली दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी दीड मिली स्नायूत टोचावे.<br>• नाकपुडीला निलगिरी तेल लावणे. |

| क) प्रजनन संस्था | प्रथमोपचार पद्धत |
|---|---|
| **वार न पडणे :-** शेळी / मेंढीस विताना झालेला त्रास, जास्त वय / म्हातारपण, संतुलित खाद्याचा अभाव यामुळे वार अडकून राहते व आत सडण्याची क्रिया होऊन जनावर कुचंबते, बेचैन होते. | • घाण वास व स्त्राव येत असल्यास रिप्लांटा / ल्युकोसुल पावडर सकाळी व संध्याकाळी २-२ चमचे पाण्यात मिसळून सलग ३-४ दिवस द्यावी. **किंवा**<br>• घाण वास व स्त्राव येत असल्यास प्रतिजैविक इंजेक्शन (इंजेक्शन टेरामायसिन एल ए) प्रौढ शेळीस ३ मिली स्नायूत टोचणे. **किंवा**<br>• एक्झापार / एम टू टोन हे गर्भाशयाचे टॉनिक २० मिली दररोज सलग ३ दिवस पाजावे.<br>• बाजरीच्या कण्या गुळामध्ये शिजवून खायला घालाव्यात. |

| ड) विषाणूजन्य आजार | प्रथमोपचार पद्धत |
|---|---|
| **मावा येणे :** शेळ्या / मेंढ्यांमध्ये विशेषत: लहान पिल्लांमध्ये मावा येण्याचे प्रमाण जास्त रहाते. तोंडात व ओठावर जखमा होतात.<br>खाता न आल्यामुळे करडे / कोकरे अशक्त होतात. | • तोंडामध्ये व ओठाला जेन्शन व्हायोलेट (शाईच्या रंगाचे औषध) लावावे. **किंवा**<br>• ढपल्या मऊ होण्यासाठी जखमांना बोरोग्लिसरीन लावावे.<br>आजार जास्त आहे असे वाटल्यास<br>• इंजेक्शन ओरिप्रिम / सल्प्रिम करडांना / कोकरांना पहिल्या दिवशी एक मिली दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी अर्धा मिली स्नायूत टोचावे.<br>• कोवळा व लुसलुशीत चारा / लापशी द्यावी. |

| इ) शरीरबाह्य आजार | प्रथमोपचार पद्धत |
|---|---|
| **१) जखमा :** कोणत्याही अपघाताने, आजारपणातील झालेल्या साध्या किंवा आसाडीयुक्त जखमा. | • साध्या जखमा स्वच्छ पाणी व साबणाने धुवून स्वच्छ व ओल्या कापसाने कोरड्या करून त्यावर १ भाग झिंक ऑक्साईड + ५ भाग व्हॅसलिन मिसळून तयार केलेले मलम लावावे. (पांढरे मलम)<br>• आसाडी असलेल्या जखमेवर टरपेन्टाईन तेल सोडून चिमटा अथवा नाचकण याने आळ्या वेचून काढाव्यात. त्या जखमेत कापूस भरून त्यावर टरपेन्टाईन सोडावे. संध्याकाळी जखम स्वच्छ पाणी व साबणाने धुवून कोरडी करून त्यावर पांढरे मलम लावावे. **किंवा**<br>• झेंडू / सिताफळाचा / कारल्याचा पाला चेचून जखमेत भरावा. त्यावर १ कापूर वडी व डिकेमली लावावी. |

| इ) शरीरबाह्य आजार | प्रथमोपचार पद्धत |
| --- | --- |
| **२) गळू / आवळ :**<br>शरीरावर वेगवेगळ्या ठिकाणी मार लागल्यामुळे झालेल्या जखमेतून जंतुसंसर्गामुळे सूज येऊन कालांतराने तेथे मऊ व लिबलिबीतपणा येतो व नंतर फुटून त्यामधून पांढरट, घट्ट चिकट घाण बाहेर पडते. | • फुटलेल्या गळू / आवळातील सर्व घाण कागदावर किंवा कापडावर घ्यावी. ती घाण जमिनीवर किंवा इतर जनावरांना लागणार नाही याची काळजी घेऊन जाळून टाकावी.<br>• गळू फुटलेल्या ठिकाणी पोटॅशिअम परमँगनेटयुक्त पाणी वापरून सर्व घाण धुऊन आयोडीन लावावे, व पांढरे मलम लावून मलमपट्टी करावी.<br>• आवळ फुटल्याशिवाय प्रतिजैविकांचा वापर करू नये. |

| ई) बाह्य परोपजीवी कीटक प्रादुर्भाव | प्रथमोपचार पद्धत |
| --- | --- |
| **गोचिड, पिसवा, गोमाशा :**<br>गोठ्यातील अस्वच्छता, दमट, कोंदट हवामान, पाण्याची साठलेली डबकी यामुळे बाह्य परोपजीवींचा उपद्रव वाढून जनावरे बेचैन होणे, केस गळणे, खाज, रक्तक्षय होणे हा त्रास दिसून येतो. | • ब्युटॉक्स हे औषध २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून अंगावर व गोठ्यावर फवारणे. **किंवा**<br>• १०० लिटर पाण्यामध्ये १ लिटर मॅलेथिऑन + १ लिटर नीमार्क एकत्र करून आंघोळ घालणे. (जखमा असलेल्या व रोगट जनावरांना आंघोळ घालू नये. विषबाधा होऊ शकते). **किंवा**<br>• पशुवैद्याच्या सल्ल्याने बायटिकॉल / पोअरऑन हे औषध पाठीवर सोडून बाह्य परोपजीवी निर्मूलनासाठी वापरता येते.<br>• बाह्य परोपजीवींचा पूर्णपणे व प्रभावीपणे नायनाट करण्यासाठी अंगावर व गोठ्यात एकाच वेळी औषध फवारणी झाली पाहिजे. अथवा गोठा पक्क्या बांधकामाचा व पत्र्याच्या छपरात असेल तर गोठ्यात पाचट टाकून ते पेटवावे अथवा फ्लेमगनने जमीन व भिंती जाळून घ्याव्यात म्हणजे फटींमधील गोचिडा मरतील. |

टीपः प्रतिजैविक इंजेक्शन दिल्यानंतर एक महिना ह्या इंजेक्शन दिलेल्या शेळ्या / मेंढ्या / करडे / कोकरांचे मटण खाऊ नये किंवा दूध पिऊ नये. कारण एक महिन्यापर्यंत ह्या औषधाचा काही अंश मटण व दुधामध्ये राहतो व तो माणसांना हानिकारक ठरू शकतो. त्याचप्रमाणे माणसांमधील जीवाणूंमध्ये प्रतिजैविकाला प्रतिकारशक्ती निर्माण होऊन हे प्रतिजैविक माणसांमध्ये प्रभावहीन होण्याचा धोका संभावतो.

# सूचना

- साथीच्या / जास्त गंभीर आजारपणाच्या काळात पशुवैद्याच्या सल्ल्याने आवश्यक व त्वरित करावयाचे उपचार करावेत. प्रथमोपचार करण्यात वेळ वाया घालवू नये.
- प्रथमोपचारासाठी आवश्यक सिरिंज, सुया, चिमटा, कात्री, इत्यादी प्रकारचे सर्व साहित्य स्वच्छ व निर्जंतुक करून ठेवलेले असावे.
- प्रथमोपचार म्हणून शेळ्या–मेंढ्यांना डागू नये तसेच खराब रक्त निघून जावे या गैरसमजापोटी कान कापू नयेत.
- आजारी जनावरांना प्रथमोपचार केल्यावर संतुलित आहार, चांगल्या प्रतीचा मऊ व लुसलुशीत चारा देणे आवश्यक आहे. शक्य असल्यास निरोगी जनावरांपासून वेगळे काढावे.
- आजारी जनावरांवर उपचाराबरोबरच दिवसातून २–३ वेळा जातीने लक्ष ठेवल्यास जनावर आजारातून लवकर बरे होईल.



• संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक : ०२१६६–२६२१०६/२००७८३

जानेवारी २०१५